# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२-२९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्र. ५६-२२** **दिनांक २०/०२/२०२२**

## रेकी करुन व्यापा-यांच्या दुकानांचे शटर तोडून घरफोडी चोरी करणारे ०३ सराईत आरोपीतांना अटक करुन एकुण १० गुन्हे ऊघडकीस-विरार पोलीस स्टेशनची कामगिरी.

मागील काही महिन्यांमध्ये विरार पोलीस ठाण्याच्या हद्दिमधील व्यापा-यांच्या दुकानांच्या बंद शटरला लावलेली टाळे रात्री ०२:०० वा. ते सकाळी ०६:०० वा. च्या दरम्यान कुणीतरी तोडून ड्राव्हरमध्ये ठेवलेल्या रोख रकमेची सातत्याने चोरी केल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले होते. सदर प्रकारच्या गन्हयाच्या सर्व घटनास्थळी विरार पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकारी आणि अंमलदार यांनी भेट देऊन उपलब्ध सीसीटीव्ही फुटेजव्दारे आरोपींच्या गुन्हे करण्याची पध्दत, तांत्रीक तपास आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे गोपचर पाडा, विरार (पू.) मधून तीन आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये त्यांचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने आरोपी नामे १) अब्दुल अनीस नुर मोहम्मद शेख, २) दिलमोहम्मद ऊर्फ बाबू अब्दुल कुद्दुस शेख, व ३) समीर ऊर्फ पापे बादशाह शेख, वय २४ वर्षे सर्व रा. इंदिरा नगर पाईपलाईन झोपडपट्टी, बांद्रा टर्मीनसच्या समोर, बांद्रा पुर्व, मुंबई यांना अटक केली आहे.

सदरील आरापी हे रेल्वे स्टेशन किंवा त्या जवळच्या परिसरामध्ये स्क्रु ड्रायव्हर आणि कटावणीच्या सहाय्याने दुकानांच्या शटरचे कडी कोयंडा ऊचकटून त्यामध्ये असलेली रोख रक्कमेची चोरी करण्याकरीता दिवसाच्या वेळी परिसरामध्ये फिरुन रेकी करणे आणि रात्रीच्या वेळी चोरी करणे अशाप्रकारची कार्यपध्दती वापरत असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले असून सदर आरोपीतांकडून खालीलप्रमाणे गुन्हे ऊघडकीस आलेले आहेत.

१. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १५४/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
२. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १८५/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
३. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १८७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
४. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १८८/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०, ५११
५. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १८९/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
६. विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १५७/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
७. नवघर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १०३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
८. कस्तुरबा मार्ग पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ९०/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
९. कांदिवली पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ८४/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०
१०. वांद्रे पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. ६६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८०

आरोपींकडील तपासादरम्यान वरील प्रमाणे गुन्हे उघडकीस झालेले असून अ. क्र. ०१ ते ०७ मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस ठाणेकडील असून अ.क्र. ०८ ते १० बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस ठाणे आहे. त्याचप्रमाणे यातील अटक आरोपींवर बृहन्मुंबई, ठाणे, मि.भा.व.वि., लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये घरफोडी व इतर चोरीचे सुमारे ७० गुन्हे दाखल असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, श्री. रामचंद्र देशमुख, सहाय्यक पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश वराडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप राख, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. हर्षद चव्हाण, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, युवराज वाघमोडे आणि सागर घुगरकर यांनी केली आहे.



*********